**<u>संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ७७/२०२३ निशाणी १२ लगत पुढील सरतपास</u>**

**<u>विधिज्ञ श्री. निसार शेख</u>**

८. या कामी निशाण ३/३ येथे धनादेश सादर केलेला आहे. त्या धनादेशावरील आरोपीची सही आहे ती मी ओळखतो. (**सदर धनादेशाला परक्राम्य दस्ताऐवज अधिनियम १८८१ चे कलम ११८ व १३९ अन्वये गृहीतक असल्यामुळे त्याला निशाणी क्र.१३ देण्यात येते.**) निशाणी ३/५ कडे धनादेश अनादरीत झाल्याबाबत औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मेमो सादर केला आहे. त्यावर बँक अधिकारी यांची सही व बँकेचा शिक्का आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. (**सदर मेमोला परक्राम्य दस्ताऐवज अधिनियमचे कलम १४६ अन्वये गृहीतक असल्यामुळे त्याला निशाणी क्र.१४ देण्यात येते.)** निशाणी ३/२ येथे धनादेश जमा केल्याबाबत औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी स्लीप सादर केला आहे. त्यावर बँक अधिकारी यांची सही व बँकेचा शिक्का आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. (**सदर मेमोला परक्राम्य दस्ताऐवज अधिनियमचे कलम १४६ अन्वये गृहीतक असल्यामुळे त्याला निशाणी क्र.१५ देण्यात येते.)** निशाणी ३/४ येथे धनादेश अनादरीत झाल्याबाबत औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक स्लीप सादर केला आहे. त्यावर बँक अधिकारी यांची सही व बँकेचा शिक्का आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. **(सदर मेमोला परक्राम्य दस्ताऐवज अधिनियमचे कलम १४६ अन्वये गृहीतक असल्यामुळे त्याला निशाणी क्र.१६ देण्यात येते.)**

९. तसेच कामी निशाणी ३/६ येथे आरोपीस पाठवलेल्या नोटीसची कार्यालयीन प्रत दाखल केली आहे. त्यावरील वकिलांची सही मी ओळखतो. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. **(त्यास निशाणी क्र.१७ देण्यात येते.)** निशाणी ३/७ कडे आरोपी पहिल्या पत्यावर पाठवलेल्या नोटीसची पोस्टाची

स्लिप दाखल केली आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. **(त्यास निशाणी क्र.१८ देण्यात येत आहे.)** तसेच निशाणी ३/८ कडे आरोपीला मी नोटीसचे पोहच झाल्याबाबतची पोस्टाची पावती सादर करण्यात आलेली आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. **(त्यास निशाणी क्र.१९ देण्यात येत आहे.)** याकामी निशाण ३/१ येथे मला आमच्या पतसंस्थेने कामकाज चालविण्यासाठी अधिकार पत्र दिलेले असून त्याच्यावर सचिव यांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. **(त्यास निशाणी क्र.२० देण्यात येत आहे.)**

**आरोपीतर्फे उलटतपासाठी अर्ज नसल्यामुळे फौ.प्र.सं.३१३ साठी ठेवण्यात यावे.**

Digitally signed by VINAYAK DATTATRAY PATIL
Date: 2025.02.12 17:41:28 +0530

कन्नड (वि. द. पाटील)

दिनांक : १२/०१/२०२५ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, कन्नड

**CERTIFICATE**

I affirm that the, contents of this P.D.F. file order are same word to word, as per the original order -

| | |
|---|---|
| Name of Stenographer | V. D. Khambat, (Grade-III) |
| Court | Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C., Kannad |
| Date | 12/02/2025 |
| Order signed by the Presiding Officer | 12/02/2025 |
| Order uploaded on | 12/02/2025 |